| CNR No.: MHAM170006262025 | नियमित फौजदारी खटला क्रमांक ४५/२०२५ | | | |
|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | :– | २४.०३.२०२५ | |
| | नोंदणी तारीख | :– | २४.०३.२०२५ | |
| | निकाल तारीख | :– | ०२.०७.२०२६ | |
| | कालावधी | :– | वर्ष | महिना | दिवस |
| | | | ०१ | ०३ | ०९ |
| | निशानी क्रमांक | :– | १५ | |

**फॉर्म क्रमांक ३२**
**भाग अ**
**न्यायनिर्णय**
**[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (i)]**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, तिवसा, ता. तिवसा,**
**जिल्हा – अमरावती यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी रोहिणी वि. मनोरे)**
**न्यायनिर्णय**
**(घोषीत दिनांक ०२.०७.२०२६)**
**नियमीत फौजदारी खटला क्र.४५/२०२५**
**सरकार विरूध्द शंकर सुखदेवराव भुसारी**
**अपराध क्रमांक ७५/२०२५ पोलीस स्टेशन, तिवसा**

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन मार्फत पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन, तिवसा, ता. तिवसा, जिल्हा – अमरावती. |
| अभियोग पक्षातर्फे वकील | **कु. एल. टी. गेडाम,** सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **शंकर सुखदेवराव भुसारी**<br>वय – ४१ वर्ष, व्यवसाय – मजुरी,<br>राहणार – शेंदुरजना बाजार,<br>ता. तिवसा, जि. अमरावती. |
| आरोपीतर्फे अधिवक्ता | **विद्वान विधिज्ञ श्री. एन. ओ. गजबे.** |

नि.फौ.ख.क्र. ४५/२०२५
शासन वि. शंकर सुखदेवराव भुसारी
न्यायनिर्णय (नि. क्र. १५)

## भाग ब

## [फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (ii)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २०.०२.२०२५ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | २०.०२.२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २४.०३.२०२५ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २४.०७.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १३.०४.२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | लागु नाही. |
| न्यायनिर्णय घोषीत तारीख | **०२.०७.२०२६** |
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख | लागु नाही. |

## आरोपींचा तपशील

| आ. क्र. | आरोपींचे नांव | समजपत्र दिल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ नुसार संपरीक्षे दरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शंकर सुखदेवराव भुसारी | २२.०२.२०२४ | ०९.०५.२०२५ | भा. न्या. सं., २०२३ चे कलम ११८ (१), ३५१ (२) (३) व ३५२ | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |

## न्यायनिर्णय

## (पारीत दिनांक ०२.०७.२०२६ )

आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८ (१), ३५१ (२) (३) व ३५२ (थोडक्यात 'भा.न्या.सं.,२०२३') अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याकरीता संपरिक्षा चालविण्यात आली.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.**

२. दिनांक २०.०२.२०२५ रोजी सकाळी ८:३० वाजताचे दरम्यान शेंदुरजना बाजार येथे फिर्यादीच्या घरा शेजारी असणारे आरोपीचे दोन लहान मुले घरावरील टिनावर विटा फेकत असल्यामुळे फिर्यादीचे आईने त्यांना तुम्ही माझे घरावरील टिनावर विटा का फेकता असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीला व तिच्या आईला म्हटले की, तुम्ही माझे मुलांना का बोलली म्हणुन आरोपीने फिर्यादीला व तिच्या आईला शिविगाळ केली व फिर्यादीच्या उजव्या हातावर काठीने मारुन जखमी केले. तसेच फिर्यादीच्या आईला लोटलाट केली व शिविगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. म्हणुन, सदरच्या घटनेवरुन फिर्यादीने आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन, तिवसा येथे फिर्याद नोंदविली.

३. फिर्यादीच्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, तिवसा येथे आरोपीविरुध्द गुन्हा क्रमांक ७५/२०२५ नुसार भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८ (१), ३५१ (२) (३) व ३५२ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला. त्याचा स.पो.उप.नि. श्री. गिरी,

ब. नं. ११५ यांनी केला. त्यांनी घटनास्थळावर जाऊन पंचांसमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. साक्षीदारांचे बयाण नोंदविले. तपास पुर्ण करुन तपासी अधिकारी यांनी न्यायालयात आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. संपरीक्षेदरम्यान आरोपीविरुध्द निशाणी क्रमांक १० नुसार दोषारोप निश्चीत केला. सदरचा दोषारोप हा आरोपीला मराठी भाषेमध्ये वाचुन व समजावुन सांगीतला. आरोपीने तो नाकबुल असल्याचे सांगीतले व खटला पुढे चालविण्याची मागणी केली.

५. आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने एक साक्षीदार तपासला. निशाणी क्रमांक १ वरील आदेशान्वये अभियोग पक्षाचा पुरावा त्यांच्या विनंतीवरुन बंद करण्यात आला. आरोपीविरुध्द कोणताही पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ (१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६. अभियोग पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता कु. एल. टी. गेडाम व आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एन. ओ. गजबे यांचा युक्तीवाद ऐकला.

७. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता तसेच आरोपीचे विद्वान विधीज्ञ यांनी केलेल्या युक्तीवादावरुन खालील मुद्दे न्यायनिवाडा करण्याकरीता माझ्या पुढे उद्भवले. त्यांचे सकारण निष्कर्ष व कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपीने फिर्यादी चंदा किसनराव तराळे हीच्या डाव्या हातावर काठीने मारुन व फिर्यादीची आई नामे नर्मदाबाई तराळे हिला लोटालाट करुन जखमी केल्यामुळे भा. न्या. सं., २०२३ चे कलम ११८ (१) प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| २. | आरोपीने फिर्यादी चंदा किसनराव तराळे व फिर्यादीची आई नामे नर्मदाबाई तराळे यांना जिवे मारण्याची धमकी देवुन फौजदारी पात्र धाकदपटशा करून भा. न्या. सं.,२०२३ चे कलम ३५१ (२) (३) प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नाही.** |
| ३. | आरोपीने फिर्यादी चंदा किसनराव तराळे व फिर्यादीची आई नामे नर्मदाबाई तराळे सार्वजनीक शांततेचा भंग करावा किंवा अन्य कोणताही अपराध करावा या उद्देशाने त्याचा अपमान करुन त्याला प्रक्षोभीत करून भा. न्या. सं.,२०२३ चे कलम ३५२ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| ४. | आदेश काय ? | **अंतीम आदेशाप्रमाणे आरोपीची निर्दोष सुटका करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ ते ३ करीता –**

८. वरील सर्व मुद्दे एक सारख्या पुराव्यावर आधारीत असल्यामुळे पुराव्याची व तथ्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांचे विवेचन एकत्रीतपणे करण्यात येत आहेत. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने फिर्यादी म्हणुन साक्षीदार क्रमांक १ चंदा (नि.क्र.१४) हिला तपासले. तिने तिच्या पुराव्यादरम्यान घटना ही मागच्या वर्षी प्रगटदिनाच्या दिवशी सकाळी ५:०० वाजता घडल्याचे तिने सांगीतले. तिची आई मानसिक रुग्ण असल्याने आरोपी व तिच्या आईच्या दरम्यान वाद झाल्याचे तिने सांगीतले. घटनेबाबत तिने रिपोर्ट दिल्याचे सांगीतले. तिची रिपोर्ट व प्रथम खबरी अहवालावर सही असुन त्यातील मजकुर माहीत नसल्याचे तिने सांगीतले. तसेच रिपोर्ट व प्रथम खबरी अहवालात काय लिहीले आहे हे तिला आठवत नसल्याचे तिने तिच्या पुराव्यादरम्यान सांगीतले.

९. सदर साक्षीदार ही अभियोग पक्षास मदत करत नसल्याकारणाने भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ चे कलम १५७ नुसार अभियोग पक्षाने उत्तर सुचक प्रश्न विचारले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाने विचारलेल्या उत्तर सुचक प्रश्नमध्ये दिनांक २०.०२.२०२५ रोजी सकाळी ८:०० वाजताच्या दरम्यान तिच्या आईने आरोपीच्या दोन्ही मुलांना म्हटले होते की, “माझ्या टिनावर विटा फेकत आहे" असे तिने

सांगीतले. अभियोग पक्षाने विचारलेले इतर उत्तर सुचक प्रश्न तिने स्पष्टपणे नाकारले. तिने तिच्या उलटतपासदरम्यान मान्य केले की, तिने रागाच्या भरात आरोपीविरुध्द रिपोर्ट दिला. तसेच तिने हे देखील स्पष्टपणे मान्य केले की, आरोपी व तिच्या दरम्यान न्यायालयाच्या बाहेर आपसी समझोता झाला असुन आरोपीला निर्दोष मुक्त केल्यास तिची काही हरकत नाही. सदर साक्षीदाराच्या बयाणाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदरहु साक्षीदाराने अभियोग पक्षास आरोपीविरूध्द सदरचा खटला सिध्द करण्याकरीता कोणतेही सहकार्य केलेले नाही. उलटपक्षी सदर साक्षीदाराने आरोपीसोबत तिचा न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाल्याचे कथन केले. तसेच तिला आरोपीविरूध्द सदरचा खटला पुढे चालवायचा नसल्याचे कथन केले.

१०. अभियोग पक्षातर्फे इतर कुठलाही साक्षीदार तपासण्यात आला नाही. अभियोग पक्षाला वारंवार साक्षीदार तपासण्याकरीता संधी देण्यात आली. परंतु, अभियोग पक्ष हा इतर महत्वाचे साक्षीदार तपासण्यात अपयशी ठरला. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याची जबाबदारी ही पुर्णपणे अभियोग पक्षावर असते. अभियोग पक्षाकडुन तपासण्यात आलेल्या फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, तिने अभियोग पक्षाला आरोपीविरूध्द गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्यामध्ये कुठलीही मदत केलेली नाही. अभियोग पक्षाच्या साक्षीदाराने आरोपीविरूध्द कुठलाही पुरावा दिलेला नाही. अभियोग पक्षाने फिर्यादी म्हणुन तपासलेले साक्षीदार

क्रमांक १ चंदा (नि.क्र.१४) हिने आरोपीविरूध्द दिलेल्या फिर्यादमधील व छापील प्रथम खबरी अहवालामधील मजकुर माहीती नसल्याचे सांगीतले.

**११.** अभियोग पक्षाने तपासी अधिकाऱ्याला तपासले नाही. त्यामुळे अभियोग पक्ष आरोपीविरूध्दची फिर्याद सिध्द करू शकला नाही. त्याचप्रमाणे अभियोग पक्ष हा आरोपीविरूध्द घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करून घेण्यासही अपयशी ठरला आहे. तसेच अभियोगपक्ष हा इतर महत्त्वाचे साक्षीदार तपासण्यात अपयशी ठरला. अभियोग पक्षाने घेतलेल्या पुराव्याचे एकंदरीत अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आरोपीने फिर्यादी चंदा किसनराव तराळे हीच्या डाव्या हातावर काठीने मारुन व फिर्यादी आई नामे नर्मदाबाई तराळे ही लोटालाट करुन जखमी केल्यासंबंधीचा व फिर्यादीला व तिच्या आईला शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्यासंबधीचा कुठलाही सबळ व पुरेसा पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

**१२.** प्रस्तुत खटल्यामध्ये फिर्यादी व आरोपीने निशाणी क्रमांक १३ वर संयुक्तीरीत्या पुरसीस दाखल करुन त्यांचा न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झाल्याचे सांगीतले. अभिलेखावर दाखल असलेल्या पुराव्याच्या आधारे हे न्यायालय या निष्कर्षावर पोहोचत आहे की, अभियोग पक्ष हा आरोपीविरुध्द सबळ पुराव्याअभावी भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८ (१), ३५१ (२) (३) व ३५२ नुसारचा दोषारोप

संशयापलीकडे सिध्द करण्यास पुर्णपणे अपयशी ठरलेला आहे. **त्यामुळे सदर न्यायालय मुद्दे क्रमांक १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.**

**मुद्दा क्रमांक ४ करीता –**

**१३.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द कोणत्याही प्रकारचा सबळ, विश्वसनीय, पुरेसा व संशयाच्या पलीकडचा पुरावा अभिलेखावर सादर केला नाही. त्यामुळे सदर खटल्यातुन आरोपीला निर्दोष मुक्त करणे योग्य होईल, असे दिसुन येते. जप्त मुद्देमाल एक बाश्याची काठी मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी. **सदर न्यायालय मुद्दा क्रमांक ४ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.**

## आदेश

**१.** आरोपी शंकर सुखदेवराव भुसारी वय – ४१ वर्षे, व्यवसाय – मजुरी, राहणार –शेंदुरजना बाजार, ता. तिवसा, जि. अमरावती यांची प्रस्तुत खटल्यातुन भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८ (१), ३५१ (२) (३) व ३५२ अन्वयेच्या गुन्हयांमधुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१ (१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** जप्त मुद्देमाल एक बाश्याची काठी मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी.

**३.** आरोपीचा वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

**४.** आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ नुसार रुपये १५,०००/– चा वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा दयावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आला).**

स्वा/–
**(रोहिणी वि. मनोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, तिवसा,
ता. तिवसा, जि. अमरावती.

दिनांक : **०२.०७.२०२६.**
स्थळ : **तिवसा**

नि.फौ.ख.क्र. ४५/२०२५
शासन वि. शंकर सुखदेवराव भुसारी
न्यायनिर्णय (नि. क्र. १५)

## भाग क

## [फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (iii)]

### अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी/बचाव/न्यायालयाचे साक्षीदार

अ. अभियोग :–

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| साक्षीदार क्रमांक १ | चंदा किसनराव तराळे (नि.क्र.१४) | फिर्यादी |

ब. बचाव साक्षीदार :–

| श्रेणी | नांव | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क. कोर्ट साक्षीदार :–

| श्रेणी | नांव | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## अभियोग पक्षाचे/बचाव/कोर्ट निशाणी

**अ. अभियोग :–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ब. बचाव :–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी :–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल :–**

| अनुक्रमांक | मुद्देमाल क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

स्वा/–
**(रोहिणी वि. मनोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, तिवसा,
ता. तिवसा, जि. अमरावती.

दिनांक : **०२.०७.२०२६.**
स्थळ : **तिवसा**

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same word to word, as per original Judgment."

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | **Vijay K. Kaware** |
| Name of Court | : | Civil and Criminal Court, Teosa |
| Judgment dictated on | : | 02.07.2026 |
| Transcript ready on | : | 02.07.2026 |
| Judgment Signed by Presiding Officer on | : | 02.07.2026 |
| Judgment uploaded on | : | 02.07.2026 |